## प्रकरण पाचवे

## मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांच्या समस्या

### ' अ ' विभाग

मराठी अध्यापनपध्दती शिकविणाऱ्या अध्यापकांच्या समस्यांचा अभ्यास


५.१ प्रास्ताविक
५.२ प्रश्नावली भरून देणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती.
५.३ मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी.
५.४ मराठी अध्यापनपध्दती या विषयाशी संबंधित बाबी.
५.५ पाठाचे टाचण काढताना मार्गदर्शन करताना येणाऱ्या अडचणी.
५.६ मराठी विषयाच्या पाठांचे निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी.
५.७ मराठी अध्यापनपध्दतीबद्दलचे धोरण.
५.८ मराठी अध्यापनपध्दतीच्या संदर्भात अन्य उपयुक्त माहिती.


### ' ब ' विभाग

पदवी आणि-अथवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी विषय नसलेल्या तसेच बी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती नसलेल्या आणि तरीही मराठी पाठांचे निरीक्षण करावया लागणाऱ्या अध्यापकांच्या समस्यांचा अभ्यास


५.९ प्रास्ताविक.
५.१० प्रश्नावली भरून देणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती.
५.११ मराठीच्या पाठांचे निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी.
५.१२ प्रस्तुत संशोधनास अन्य उपयुक्त माहिती.
५.१३ समारोप.

## ` अ ` विभाग

## मराठी अध्यापनपध्दती शिकविणा-या अध्यापकांच्या समस्या

### ५.१ प्रास्ताविक :

प्रकरण दोन, तीन, चार मध्ये प्रस्तुत संशोधनाला अनुकूल ठरेल अशी अनुक्रमे मराठी अध्यापनपध्दती, अर्थ, महत्त्व, उद्दिष्टे, मराठीच्या विविध अध्यापनपध्दतींचे स्वरूप आणि मराठी अध्यापकाकडे असावे लागणारे गुणविशेष याबाबत चर्चा केली आणि प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी सैध्दांतिक पार्श्वभूमी तयार केली. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणात ` मराठी अध्यापनपध्दती ` शिकविणा-या अध्यापकांच्या विविध समस्यांचा ऊहापोह केलेला आहे. ह्या समस्या जाणून घेण्यासाठी दोन प्रश्नावल्या तयार केलेल्या होत्या, ह्या प्रश्नावल्या परिशिष्ट ` अ ` आणि ` ब ` मध्ये दिलेल्या आहेत. ह्या प्रश्नावलींची तपशीलवार माहिती प्रकरण ` एक ` मध्ये दिलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात संशोधक वगळता ` मराठी अध्यापनपध्दती ` या विषयाचे अध्यापन करणारे एकूण सहा अध्यापक आहेत. सहापैकी पाच जणांनी त्यांच्यासाठी तयार केलेली प्रश्नावली (परिशिष्ट अ) प्रस्तुत संशोधकाच्या समोरच भरून दिली. या पाच अध्यापकांनी प्रश्नावली मधील दिलेल्या प्रतिसादांचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणाच्या ` अ ` विभागात केलेले आहे. याच प्रकरणाच्या ` ब ` विभागात बी.ए. आणि-किंवा एम.ए. परीक्षेला मराठी मुख्य विषय नसलेल्या तसेच बी.एड्. ला मराठी अध्यापनपध्दती नसलेल्या आणि तरीही मराठी पाठांचे निरीक्षण कराव्या लागणा-या अध्यापकांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

### ५.२ (अ) प्रश्नावली भरून देणा-या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती :

मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करणारे सर्वच अध्यापक एम्.ए., एम्.एड्. असल्यामुळे अध्यापक महाविद्यालयांत शिकविण्यासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

त्यांच्याकडे आहे तथापि ` मराठी अध्यापनपध्दती ` हा विषय शिकविण्यास आवश्यक ती अर्हता आहे का ते पाहाणे प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संदर्भात आवश्यक आहे. त्यासाठी पुढील सारणी ५.१ पहावयास हवी.

सारणी क्र.५.१

पदवी, पदव्युत्तर आणि बी.एड्. परीक्षेला घेतलेल्या विषयांची सारणी

| विषय | पदवी परीक्षा | | पदव्युत्तर परीक्षा | | बी.एड्.च्या |
|---|---|---|---|---|---|
| | मुख्य विषय | गौण विषय | मुख्य विषय | गौण विषय | अध्यापन-पध्दती |
| मराठी | ३ | १ | ५ | - | ५ |

वरील सारणीनुसार असे माहीत होते की एकूण पाच अध्यापकांपैकी पदवी परीक्षेस मराठी हा मुख्य विषय घेतलेले तिघे आहेत. गौण विषय मराठी घेतलेला एकजण आहे. पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय घेतलेले पाच जण म्हणजे सर्वजण आहेत. मराठी अध्यापनपध्दती घेतलेले पाच जण म्हणजे सर्व जण आहेत. मराठी अध्यापनपध्दती शिकविणाऱ्या अध्यापकांची वास्तविक शैक्षणिक पात्रता म्हणजे पदवी परीक्षेस मुख्य विषय मराठी आणि पदव्युत्तर परीक्षेस मुख्य विषय मराठी आणि बी.एड्. परीक्षेस मराठी अध्यापनपध्दती आहे, पण वरील तक्त्या-वरून असे आढळते की, पदवी परीक्षेस मराठी मुख्य विषय असलेले तिघेच आहेत. त्यामुळे ` मराठी अध्यापनपध्दती ` हा विषय शिकविण्यास केवळ तीनच जण पात्र आहेत. पदवी परीक्षेला `मराठी ` गौण विषय घेतलेला अध्यापकही विद्यापीठाच्या नियमानुसार हा विषय शिकविण्यास पात्र नाही. त्यामुळे उरलेल्या अध्यापकाचा याबाबतीत विचार देखील करावयास नको.

अध्यापक महाविद्यालयातील नोकरीची एकूण वर्षे किती याबाबत अध्यापकांना प्रश्न विचारला होता. तसेच अध्यापकांना मराठी अध्यापनपध्दतीच्या संदर्भात मार्गदर्शनाचा अनुभव एकूण किती वर्षे आहे याबाबतही विचारणा करण्यात आली होती. वरील दोनही प्रश्नांच्या अनुषंगाने मिळालेली माहिती पुढील दोन सारण्यांत (सारणी क्र. ५.१ व सारणी क्रमांक ५.२) नोंदविलेली आहे.

सारणी क्र.५.१

नोकरीचा एकूण वर्षे अनुभव

| वर्षे (वर्गांतर) | अध्यापक संख्या |
|---|---|
| १३-१५ | १ |
| १०-१२ | - |
| ७-९ | १ |
| ४-६ | - |
| १-३ | ३ |
| | ५ |

सारणी क्र. ५.२

मराठी अध्यापनपध्दतीच्या अध्यापनाचा एकूण वर्षे अनुभव

| वर्षे (वर्गांतर) | अध्यापक संख्या |
|---|---|
| ७-९ | २ |
| ४-६ | - |
| १-३ | ३ |
| | ५ |

वरील सारणी क्रमांक ५.१ वरून अशी माहिती मिळते की ०-३ वर्षांपर्यन्त अध्यापक महाविद्यालयात नोकरीचा अनुभव असणारे तिघेजण असून ७ ते ९ या वर्षांपर्यन्त अध्यापक महाविद्यालयात नोकरीचा अनुभव असणारा एक आहे. आणि १३ ते १५ वर्षांपर्यन्त अध्यापक महाविद्यालयात नोकरीचा अनुभव असलेला एकजण आहे. वरील माहितीवरून असे आढळते की ३ वर्षांपर्यन्त अध्यापक महाविद्यालयात अनुभव असलेले तुलनेने जास्त म्हणजे ६० टक्के असून ७ ते ९ वर्षांपर्यन्त अध्यापक महाविद्यालयात नोकरीचा अनुभव असलेल्यांचे प्रमाण १० टक्के आहे. १३ ते १५ वर्षांपर्यन्त अध्यापक महाविद्यालयात नोकरीचा अनुभव असलेल्यांचे प्रमाण १० टक्के म्हणजे अल्प आहे. ७ ते ९ आणि १३ ते १५ या वर्गांतरात असलेले आणि दीर्घ अनुभव असलेल्यांचे प्रमाण २० टक्के म्हणजे अल्प आहे. चांगला अनुभव असलेले या विषयाचे अध्यापक हे कोल्हापूर जिल्ह्यातील दीर्घ परंपरा असलेल्याच दोन अध्यापक महाविद्यालयातील (श्रीमती महाराणी ताराबाई ट्रेनिंग कॉलेज, कोल्हापूर आणि आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी, ता. भुदरगड) आहेत. नवीन अध्यापक महाविद्यालयात हा विषय शिकविण्याचा दीर्घ अनुभव असलेले अध्यापक नाहीत. वर उल्लेखिलेल्या आणि हा विषय शिकविण्यासाठी आवश्यक ती अर्हता नसलेले दोनही प्राध्यापक नवीन विनाअनुदान अध्यापक महाविद्यालयातील आहेत यावरून असा निष्कर्ष काढता येईल की विना अनुदान तत्वावर काढलेल्या नवीन अध्यापक महाविद्यालयांना आवश्यक ती शैक्षणिक पात्रता असलेले अनुभवी अध्यापक मिळणे कठीण दिसते.

सारणी क्र. ५. ३ चे निरीक्षण केले असता असे आढळते की ७ ते ९ या वर्गांतरात दोन अध्यापक आहेत. ४ ते ६ या वर्गांतरात कोणीच अध्यापक नाही. ० ते ३ या वर्गांतरात तिघे अध्यापक आहेत यावरून मराठी अध्यापनपध्दती शिकविण्याचा अनुभव कमी असणाऱ्यांची संख्या, इतर दोन (४ ते ६) व (७ ते ९) या वर्गांतरातील मराठी अध्यापनपध्दती शिकविण्याचा जास्त अनुभव असणाऱ्यांच्या

संख्येपेक्षा जास्त आहे असे आढळून येते म्हणजेच ` मराठी अध्यापनपध्दती ` शिकविण्याचा अनुभव कमी असलेले जास्त आहेत असे म्हणता येईल.

दोनही सारणींचा एकत्रित विचार केला असता असे नमूद करता येईल की, मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करण्याचा दीर्घ अनुभव असणा-या अध्यापकांची संख्या कमी आहे.

५.३ ` मराठी अध्यापनपध्दती ` चे अध्यापन करताना येणा-या अडचणी :

प्रश्नावलीच्या ` ब ` विभागातील १० व्या प्रश्नामध्ये मराठी अध्यापन-पध्दतीचे अध्यापन करताना अध्यापकांना येणा-या अडचणींची यादी दिलेली होती आणि सहमत असलेल्या अडचणींपुढे बरोबर (✓) अशी खूण करावयास सांगितलेली होती. अध्यापकांनी या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत (सारणी क्र.५.४) नमूद केलेला आहे.

सारणी क्र. ५.४

मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करताना अध्यापकांना येणा-या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या होय | अध्यापकांची संख्या नाही |
|---|---|---|---|
| १) | शिकविण्यासाठी पुरेशा तासिका उपलब्ध नाहीत. | ४ | १ |
| २) | प्रस्तुत अभ्यासक्रम बोजड आहे. | १ | ४ |
| ३) | मराठीच्या अभ्यासक्रमात आव्हानात्मक नावीन्य नाही. | ४ | १ |
| ४) | प्रशिक्षणार्थ्यांची वर्गात उपस्थिती असमाधानकारक असते. | २ | ३ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ५) | प्रशिक्षणार्थ्यांचा बौध्दिक दर्जा उच्च नसतो. | ४ | १ |
| ६) | मराठी ही अध्यापनपध्दती सोपी हा समज आहे. | ५ | - |
| ७) | प्रशिक्षणार्थ्यांची मराठी विषयाबद्दलची पूर्वतयारी कमी असते. | ५ | - |
| ८) | प्रशिक्षणार्थ्यांचे वाचन तयारी कमी असते. | ४ | १ |
| ९) | प्रशिक्षणार्थ्यांचे विषयज्ञान समाधानकारक व पुरेसे नसते. | ५ | - |
| १०) | प्रशिक्षणार्थ्यांना पारिभाषिक व नवीन शब्द पुरेपूर, अचूक ज्ञान असत नाहीत. | ५ | - |
| ११) | प्रशिक्षणार्थ्यांना संदर्भ ग्रंथ, नवीन अभ्यासपुस्तके वेळेवर सहज उपलब्ध होत नाहीत. | ५ | - |
| १२) | प्राध्यापकांना संदर्भ ग्रंथ, नवीन अभ्यासपुस्तके वेळेवर सहज उपलब्ध होत नाहीत. | ३ | २ |
| १३) | प्रशिक्षणार्थ्यांना पुरेशी दृक्-श्राव्य साधने हाताळण्यास मिळत नाहीत. | ५ | - |
| १४) | प्राध्यापकांना स्वत:स अशी साधने हाताळण्यास मिळत नाहीत. | ४ | १ |
| १५) | प्रशिक्षणार्थ्यांना मराठी अध्यापनपध्दतीची तयारी करण्यास वेळ मिळत नाही. | २ | ३ |
| १६) | प्रशिक्षणार्थ्यांत स्तर, भेद असतात, अध्यापन करताना ह्या भेदांचा, स्तरांचा आकलनावर कमी अधिक अनिष्ट परिणाम होतो. | ४ | १ |
| १७) | प्रशिक्षणार्थ्यांना व्यक्तिगत शंकानिरसन करण्यास म्हणावा तेवढा वेळ देता येत नाही. | ५ | - |
| १८) | प्रशिक्षणार्थ्यांकडे अपेक्षित भाषिक कौशल्ये कमी असतात. | ४ | १ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १९) | पाठमार्गदर्शक व निरीक्षक व मराठी अध्यापन पध्दतीचे प्राध्यापक यांच्या कार्यात एकसूत्रता कमी असते. | ५ | - |
| २०) | प्राध्यापकांचे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अती व्यापामुळे अध्यापनाकडे पूर्ण लक्ष राहू शकत नाही. | १ | ४ |
| २१) | प्रशिक्षणार्थी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अती व्यापात गुंतल्याने या अध्यापनपध्दतीकडे दुर्लक्ष होते. | ३ | २ |

वरील प्रतिसादाचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, अडचण क्रमांक ६, ७, ९, १०, ११, १३, १७, १९ यांना मिळालेला प्रतिसाद १०० टक्के आहे म्हणजेच पाचही जणांनी या अडचणी आहेत असे नमूद केलेले आहे. अडचण क्रमांक १४, १६, १८ या अडचणींना मिळालेला ८० टक्के प्रतिसाद आहे. म्हणजे चार जणांनी या अडचणी आहेत असे नमूद केलेले आहे. अडचण क्रमांक १२, २१ यांना मिळालेला प्रतिसाद ६० टक्के आहे म्हणजेच तिघांनी या अडचणी आहेत असे नमूद केले आहे. क्रमांक ४, १५ या अडचणी आहेत असे नमूद करणारे ४० टक्के आहेत, म्हणजे दोघे आहेत. अडचण क्रमांक १६ व २० आहेत असे मानणारा एकच आहे म्हणजेच ही अडचण आहे असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण २० टक्के आहे. वरील माहितीवरून असा निष्कर्ष निघतो की अडचण क्रमांक ६, ७, ९, १०, ११, १३, १७, १९ तसेच १४, १७, १८ आणि १२, २१ या अडचणी मानणाऱ्यांचे प्रमाण अडचणी नाहीत असे मानणाऱ्यांपेक्षा जास्त आहे. सबब या अडचणी प्रमुख अडचणी आहेत असे मानण्यास प्रत्यवाय नसावा.

`ब` विभागातील १० व्या प्रश्नाच्या उत्तरार्धात अध्यापनपध्दतीचे अध्यापन करताना येणा-या याशिवाय आणखी अडचणी नमूद करावयास सांगण्यात आल्या होत्या.

क्रमांक ७ ची अडचण विषयज्ञान अपुरे असते यास पाचपैकी तीन अध्यापकांनी पुन्हा स्वतंत्र दुजोरा दिला आहे.

अध्यापनपध्दतीसाठी आवश्यक साधने, सोयी अपु-या आहेत असे एका अध्यापकाचे मत आहे.

क्रमांक ११ आणि १२ संदर्भ ग्रंथ वेळोवेळी उपलब्ध होत नाहीत या अडचणींचा पुन्हा एका अध्यापकाने उल्लेख केलेला आहे.

प्रशिक्षणार्थी भय आणि संकोचामुळे आपल्या अडचणी मांडत नाहीत ही एक अडचण एका अध्यापकानी मांडलेली आहे. साधने, सोयी अपु-या आहेत, प्रशिक्षणार्थी भय आणि संकोचामुळे आपल्या अडचणी मांडत नाहीत या दोन्ही अडचणी नवीन आहेत.

५.४ मराठी अध्यापनपध्दती या
<u>विषयाशी संबंधित बाबी</u> :

प्रश्नावलीमधील ११ व्या प्रश्नामध्ये मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी लागणा-या गोष्टींची यादी दिलेली होती. त्यापैकी महाविद्यालयात त्या गोष्टी असल्यास पहिल्या स्तंभात बरोबर (✓) अशी खूण करावयास सांगितली होती, नसल्यास आणि त्याची आवश्यकता आहे असे वाटल्यास दुस-या स्तंभात बरोबर (✓) अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्रमांक ५.५ मध्ये मराठी अध्यापनपध्दती या विषयाच्या परिणामकारक अध्यापनासाठी आवश्यक असलेल्या बाबींची सोय आहे आणि सोय नाही पण हवी आहे असे नमूद करणारे किती याची माहिती मिळते.

## सारणी ५.५

मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी लागणा-या गोष्टी

| अनुक्रम | अध्यापन प्रभावी होण्यासाठी लागणा-या गोष्टी | सोय आहे | सोय नाही, पण हवी आहे |
|---|---|---|---|
| १) | समृध्द ग्रंथालय, संदर्भ ग्रंथ, पूरक साहित्य ग्रंथ इत्यादी | ५ | - |
| २) | दृक्-श्राव्य साधने | १ | ४ |
| ३) | प्रकल्प राबविण्याच्या सोयी व मुभा | ३ | २ |
| ४) | मराठी अध्यापनपध्दतीसाठी कृतिसत्रे | ३ | २ |
| ५) | मराठी विषयकक्षा | ३ | २ |
| ६) | पूरक कार्यक्रम सोय | ३ | २ |
| ७) | अंतर्गत मूल्यमापन सोय | ५ | - |

क्रमांक १ व ७ यांची महाविद्यालयात सोय आहे असे नमूद पाचही प जण करतात. क्रमांक ३, ४, ५, ६ सोय आहे असे तिघे जण म्हणजे ६० टक्के मान्य करतात. क्रमांक २ ची सोय आहे असे नमूद करणारा एकमेव आहे. मिळालेल्या माहितीवरून असे स्पष्ट आढळते की महाविद्यालयात सोई आहेत म्हणणा-यांचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. फक्त क्रमांक २ ची सोय हवी आहे असे म्हणणा-यांचे प्रमाण ८० टक्के आहे. क्रमांक २ ची सोय फक्त एकाच महाविद्यालयात आहे असे आढळते. हे महाविद्यालय श्रीमती महाराणी . ताराबाई अध्यापक महाविद्यालय हे आहे. हे सर्वात जुने महाविद्यालय आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की नवीन अध्यापक महाविद्यालयातून दृक्-श्राव्य साधने नसून त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. क्रमांक १ - समृध्द ग्रंथालय, पूरक साहित्य यांची सोय आहे असे जरी सर्वजण मान्य करतात

तथापि प्रस्तुत संशोधकाने दोन महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षण केले असताना असे आढळून आले की विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता ' मराठी अध्यापनपध्दती ' या विषयाच्या पाठ्यपुस्तकांच्या प्रती आणि संदर्भ ग्रंथ यांची संख्या अत्यंत असमाधानकारक आहे.

प्रश्नावलीच्या ११ व्या प्रश्नाच्या उत्तरार्धात या व्यतिरिक्त आणखी काही गोष्टींची आवश्यकता असल्यास नमूद करावयास सांगितल्या होत्या.

साधनांच्या प्रत्यक्ष वापरास एका अध्यापकाने विशेष महत्त्व दिले आहे.

तज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आणि परिसंवाद यांच्या यशस्वितेसाठी पूर्वनियोजन आवश्यक आहे असे दोन अध्यापकांनी नमूद केलेले आहे.

आदर्श पाठ दिग्दर्शनाचे विविध नमुने (गद्य, पद्य, व्याकरण, रचना) यावरही भर देण्यात आला आहे.

इतर अध्यापक महाविद्यालयांशी सुसंवाद राखण्याची निकड नमूद केली गेलेली आहे.

प्रश्नावलीच्या बाराव्या प्रश्नामध्ये मराठीच्या अध्यापनपध्दतीशी संबंधित काही गोष्टीबाबत ज्या अडचणी येतात त्या नमूद करावयास सांगितल्या होत्या आणि त्या अडचणींविषयी काही सूचना करावयाच्या असतील तर त्या करावयास सांगितल्या होत्या.

अनुक्रमांक १ मध्ये मराठीचा प्रशिक्षणार्थी ही संबंधित गोष्ट होती. यासंबंधी पुढील तक्रारी सांगितल्या गेल्या.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यनिर्मितीबद्दल जाण, आस्था नाही. त्यांचे आविष्कार कौशल्य कमी पडते. त्यांचा बौध्दिक दर्जा अपेक्षेएवढा नाही. मराठी विषय नसलेले विद्यार्थी मराठी घेतात त्यामुळे त्यांची विषय तयारी कमी असते. त्यांचे विषयज्ञान कमी असते.

ह्या अडचणींबाबत पुढील सूचना नमूद करण्यात आलेल्या आहेत :

प्रशिक्षणार्थींची मराठी अध्यापनपध्दती निवडण्यापूर्वी विषयज्ञान चाचणी घ्यावी. प्रशिक्षणार्थींची शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी खास प्रयत्न व्हावेत. वाङ्.मय प्रकारांचा अभ्यास भरपूर व्हावा म्हणून वाङ्.मयावर आधारित भरपूर पुस्तके वाचण्यास उपलब्ध करून द्यावीत. तसेच तो मराठी विषयाचा पदवीधर असावा आणि त्यालाच मराठी अध्यापनपध्दती द्यावी असे पाचापैकी चौघा अध्यापकांचे सूचनावजा मत आहे.

दुसरी संबंधित गोष्ट मराठी अध्यापनपध्दतीच्या अभ्यासक्रमाबाबत होती. याबाबत अडचणी, सूचना नोंदविण्यास सांगितलेल्या होत्या. नमूद केलेल्या अडचणी खालीलप्रमाणे :

अभ्यासक्रमात नावीन्य नाही. तो जास्त आहे, विषयज्ञानाच्या घटकांची व्याप्ती विस्तृत आहे. विवेचनाची पध्दत जुनाट आहे. अत्याधुनिक अशी या विषयज्ञानावरची पुस्तके उपलब्ध नाहीत. अभ्यासक्रमात नेमकेपणा नाही.

या अडचणींविषयी सूचना नोंदविल्या गेल्या की अभ्यासक्रम सुलभ, सुटसुटीत कमी असावा. उद्दिष्टपूर्तीस पोषक हवा. आकर्षक, सोपा, नेमका हवा. प्राध्यापकांची अभ्यासक्रमाबाबत चर्चा आणि कृतिसत्रे व्यापक हवीत. त्यांना अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात यावे.

तिसरी संबंधित गोष्ट मराठी अध्यापनतंत्राबाबत प्रशिक्षणार्थींसाठी व्याख्याने आयोजित करण्याबाबत होती. या गोष्टींबाबत नमूद झालेल्या अडचणी खाली दिलेल्या आहेत :

तज्ञ व्याख्याते सहज आणि योग्यवेळी उपलब्ध होत नाहीत. त्यांचा केवळ शाब्दिक वर्णनावर भर असतो. व्याख्यानापासून किती उपयुक्त मिळाले याचे नीट मूल्यमापन होत नाही.

याबाबत आलेल्या सूचना अशा -

व्याख्यात्यांना मराठी अध्यापन पद्धतीबाबत विविध विषय किमान आठ दिवस अगोदर द्यावेत. छात्राध्यापकांनी विचारलेल्या शंकाचे निरसन व्यवस्थित आणि समाधानकारक व्हावे. व्याख्यानात आकर्षक वैविध्य हवे. प्रशिक्षणार्थींचे सहकार्य व्याख्यानांच्या संयोजनात, कार्यक्रमात हवे.

अनुक्रम ४ ची संबंधित गोष्ट ' मराठी अध्यापनपद्धतीची प्रशिक्षणार्थींची सुजाणवृत्ती वाढविण्याबाबत ' होती. याबाबतीत येणाऱ्या आणि नोंदविलेल्या अडचणी खाली दिलेल्या आहेत.

वेळ कमी मिळतो. मराठी अध्यापन पद्धतीवर ग्रंथ अपुरे आहेत. मांडणी जुनाट आहे. विविध वाङ्मय प्रकारांचे अध्यापन सविस्तर चर्चिलेले नाही. सरसकट एकच पूनरपट्टी आणि ठराविक रूक्ष भाषा, पुस्तकांच्या मांडणीत आहे.

या अडचणीवर मात करण्यासाठी खालील सूचना नमूद केल्या.

मराठी अध्यापन पद्धतीवरच्या सुयोग्य, आधुनिक ग्रंथ निर्मितीस उत्तेजन देण्यात यावे, अर्थसाहाय्य द्यावे. कसदार, भक्कम, कल्पक उपक्रम हवेत. वेगवेगळ्या अध्यापनपद्धतीवर कृतिसत्रे हवीत. आकर्षक अध्यापन हवे.

क्र.५ ची संबंधित गोष्ट मराठी अध्यापनपद्धतीची प्रात्यक्षिके यशस्वी करणे ही होती. या गोष्टीबाबत अडचणी नमूद करावयास सांगितल्या होत्या. तसेच या अडचणीबाबत सूचना नमूद करावयास सांगितल्या होत्या. पुढील अडचणी नमूद करण्यात आल्या.

प्रात्यक्षिकासाठी आवश्यक साहित्य सहज उपलब्ध होत नाही. प्रात्यक्षिके उत्तम करून दाखविणारे तज्ञ उपलब्ध होत नाहीत. साधने हाताळण्याची तंत्रे नीट अवगत नाहीत. मुलांना सहभाग कमी मिळतो. त्यांच्याशी संपर्क कमी येतो. निरनिराळया रंजक क्लृप्त्यासाठी कल्पकता कमी पडते. प्रात्यक्षिकांचे पूर्वनियोजन

नीट नसते. योग्य मार्गदर्शक उपलब्ध होत नाहीत. पाठांचे वाटप योग्यप्रकारे होत नाही.

या अडचणींबाबत सूचना नमूद करावयास सांगितल्या होत्या. नमूद केलेल्या सूचना खाली दिल्या आहेत.

प्रात्यक्षिकासाठी भरपूर साहित्य उपलब्ध व्हावे. तज्ञ प्राध्यापकांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे. प्रात्यक्षिकांच्या तंत्राचा पूर्ण व्यवस्थित परिचय करून देण्यात यावा. प्रात्यक्षिकाबाबत पूर्वकल्पना स्पष्ट केल्या जाव्यात. प्रात्यक्षिकाबाबत नव्या दृष्टिकोणाचा वापर व्हावा. विविध तज्ञांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना सरावासाठी सतत व्हावीत.

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही अडचणी नमूद करावयास सांगितल्या होत्या. पाठ निरीक्षणाबाबत खाली नमूद केलेल्या अडचणी नोंदविल्या गेल्या.

मूल्यमापन निश्चित होत नाही. घटकांना योग्य मापाने प्रतिनिधित्व देताना व्यक्तिनिष्ठता जाणवते.

या अडचणीबाबत निरीक्षण तंत्र परिचय सूक्ष्मतेने करून दिला जावा आणि निरीक्षण साधनांच्या वापराचे ज्ञान मिळावे या सूचना नमूद झाल्या आहेत.

मार्गदर्शनाबाबत अडचणी नमूद झाल्या नाहीत पण या संदर्भात मार्गदर्शनाबाबत सर्व प्रशिक्षण महाविद्यालयात काही समान मूलभूत तत्वे, सूत्रे हवीत.

पाठनियोजन या गोष्टीबाबत अडचणी नसल्या तरी पाठनियोजनाच्या आराखड्यात एकसूत्रता हवी, अशी सूचना नोंदविली गेली आहे.

साधन वापर या गोष्टीबाबत अडचणी नोंदविल्या गेल्या नाहीत. पण लिंग्वाफोन, अक्षर नमुने, टेपरेकॉर्डरच्या वापरासाठी भाषा प्रयोगशाळा हवी ही सूचना नमूद केली गेलेली आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

अध्यापन या गोष्टीबाबत अडचणी नोंदविल्या गेल्या नाहीत. तथापि अध्यापन प्रवीण निवृत्त प्राध्यापकांची, अध्यापकांची अनुभवसमृध्द भाषणे हवीत आणि अध्यापनविषयक नवप्रवाहांची योग्य दखल घ्यावी अशा सूचना करण्यात आल्या.

विविध वाङ्.मय परिचय या गोष्टीबाबत त्यांची पार्श्वभूमी कळत नाही. ही अडचण नोंदविली गेलेली आहे पण याबाबतीत व्यापक प्रमाणावर दिनविशेषाच्या निमित्ताने वाङ्.मय प्रकारांची सर्वसाधारण माहिती, पार्श्वभूमी सांगून विविध वाङ्.मयावर आधारित कार्यक्रम सादर व्हावेत, अशा सूचना करण्यात आल्या.

वरील अडचणी व त्यावर उपाययोजना यांचा सम्यक विचार, ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

५.५ पाठाचे टाचण काढताना मार्गदर्शन
करताना येणाऱ्या अडचणी :

प्रश्नावलीच्या ` क ` विभागात १२ व्या प्रश्नामध्ये अध्यापक महाविद्यालयांत पाठाचे टाचण काढण्याचे मार्गदर्शन करताना येणाऱ्या अडचणी दिलेल्या आहेत सहमत असलेल्या अडचणींपुढे (✓) बरोबर अशी खूण करण्यास सांगितलेली होती. सारणी (५.६) मध्ये या अडचणींच्या संदर्भात मिळालेला प्रतिसाद नोंदविलेला आहे.

सारणी क्र. ५.६

पाठाचे टाचण काढण्याचे मार्गदर्शन करताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | प्रशिक्षणार्थी पाठ टाचणाचे तंत्र प्रारंभी नीट घोटवत नाहीत. | ५ | - |
| २) | प्रशिक्षणार्थी पाठ टाचण वेळेपूर्वी दाखवीत नाहीत. | ३ | २ |
| ३) | मार्गदर्शकास पाठ टाचण तपासण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. | ५ | - |
| ४) | प्रशिक्षणार्थ्यांकडून या संदर्भात दिलेल्या सूचनांचे व्यवस्थित पालन होत नाही. | ५ | - |
| ५) | दुरूस्त पाठटाचण, प्रशिक्षणार्थी पुन्हा नीट तपासून घेत नाहीत. | ५ | - |
| ६) | प्रशिक्षणार्थ्यांना पाठटाचणासाठी पुरेसा योग्य भरपूर वेळ मिळत नाही. | १ | ४ |
| ७) | प्रशिक्षणार्थ्यांना पाठ्यांश घटक आयत्यावेळी मिळतो. | ४ | १ |
| ८) | पाठटाचणात प्रशिक्षणार्थ्यांचे हस्ताक्षर गचाळ असते. | ५ | - |
| ९) | पाठ टाचणात प्रशिक्षणार्थ्यांच्या शुध्दलेखन चुका खूप आढळतात. | ५ | - |
| १०) | पाठटाचणात आशय लेखनात पाल्हाळ असतो. | ३ | २ |
| ११) | पाठटाचणात एकंदरीत तार्किक व्यवस्थितपणा कमी असतो. | ५ | - |
| १२) | प्रशिक्षणार्थी पूर्वीच्या पाठटाचणाचे सरळसरळ पुनर्लेखन करतात. | ५ | - |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १३) | प्रशिक्षणार्थी पाठटाचण यांत्रिकतेने काढतात. | ४ | १ |
| १४) | प्रशिक्षणार्थ्यांचे मराठी विषयाचे ज्ञान तुटपुंजे आढळते. | ४ | १ |
| १५) | प्रशिक्षणार्थी आपल्याला अध्यापनातील मर्म समजावे या दृष्टीने फारसे उत्सुक नसतात वा त्याविषयी त्यांना फारशी अभिरूची नसते. | ५ | - |
| १६) | पाठटाचणातील निर्देशित पाय-या व संज्ञा यांचा नेमका अर्थबोध प्रशिक्षणार्थ्यांच्याकडून झालेला पाठटाचणात दिसत नाही. | ५ | - |
| १७) | पाठटाचण अती विस्तृत होते. | २ | ३ |
| १८) | पाठटाचण अती संक्षिप्त होते. | ४ | १ |
| १९) | पाठटाचणात पाठ्यांश शिकविण्यातील विविधता कमी दिसते. | ५ | - |

वरील सारणी क्रमांक (५.६) पाहता असे स्पष्ट होते की अडचण क्रमांक १, ३, ४, ५, ८, ९, ११, १२, १५, १६, १९ यांना पाचही जणांनी सहमती दर्शविली आहे. तसेच अडचण क्रमांक ७, १३, १४, १८ यांना चार जणांनी सहमती दर्शविली आहे, तर अडचण क्रमांक २, १० यांना तिघा जणांनी सहमती दर्शविली आहे, याचा अर्थ वरील अडचणी, असहमती दर्शविणा-यांच्या अडचणीपेक्षा ख-या व बहुसंख्यांकांना प्रकर्षाने जाणवणा-या आहेत. अल्पसंख्येने सहमती दर्शविणा-यांच्या अडचणी तुलनेने बहुसंख्यांकांनी सहमती दर्शविलेल्या

अडचणींपेक्षा कमी नोंदल्या गेल्या आहेत. त्यामुळे बहुसंख्येने नोंदविलेल्या अडचणी खऱ्या व प्रमाण मानावयास हरकत नाही.

१३ व्या प्रश्नाच्या उत्तरार्धात याशिवाय या संदर्भात अन्य अडचणी असल्यास नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. त्या खाली नोंदविल्या आहेत.

प्रशिक्षणार्थी पाठतंत्र सांभाळित असता, आशयाचा आत्मा हरवून बसतो, नेमकेपणापासून दुरावतो, ही अडचण नमूद केली गेलेली आहे.

विद्यार्थ्यांचे भेद जाणून शिकविणे अवघड होते ही अडचण मांडली गेलेली आहे.

या अडचणींच्या संदर्भात त्यांचे निवारण करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यास सांगितली होती.

पाठटाचणातील मुद्दे सारखे असावेत. माहितीमध्ये क्रमबध्दता हवी. पक्क्या टाचणासोबत कच्चे टाचण घेऊन पाठ तपासला जावा. पाठतंत्र लवचिक असावे. पाठघटकांची पूर्वतयारी चांगली व्हावी. प्रशिक्षणार्थ्यांची संख्या मर्यादित ठेवावी. पाठाच्या टाचणाच्या मार्गदर्शनासाठी भरपूर वेळ दिला जावा. टाचणे समाधान होईपर्यन्त दुरूस्त केली जावीत.

आदर्श पाठ टाचणाचे नमुने उपलब्ध व्हावेत असे उपाय वरील अडचणींच्या संदर्भात सुचविले गेले आहेत.

वरील अडचणी व त्यावर सुचविलेली उपाययोजना यांचा सम्यक् विचार ' निष्कर्ष आणि शिफारशी ' या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

## ५.६ मराठी विषयाच्या पाठांचे निरीक्षण करताना येणा-या अडचणी :

प्रश्नावलीच्या ` ड ` विभागात १४ व्या प्रश्नात मराठी विषयाच्या पाठांचे निरीक्षण करताना येणा-या अडचणी दिलेल्या होत्या आणि त्या त्या अडचणीपुढे सहमती दर्शक (✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्रमांक (५.७) मध्ये या अडचणींच्या संदर्भात मिळालेला प्रतिसाद नोंदविला गेलेला आहे.

**सारणी क्रमांक ५.७**

मराठी विषयाच्या पाठांचे निरीक्षण करताना येणा-या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या होय | अध्यापकांची संख्या नाही |
|---|---|---|---|
| १) | प्रशिक्षणार्थ्यांचे वर्ग नियंत्रण असत नाही. | ४ | १ |
| २) | प्रशिक्षणार्थी फलक्यावर विषयाचे, पाठ्यांशाचे नाव लिहायचे विसरतात त्यामुळे निरीक्षण करताना पाठ्यांशबोध चटकन प्रारंभी नीट होत नाही. | ५ | - |
| ३) | मराठी अध्यापनपद्धतीच्या काही विशेष सूचना वा बाबी असतात त्या स्वत:स नीट उमगलेल्या नसतात. | ४ | १ |
| ४) | पाठटाचणाप्रमाणे पाठ घेतला जात नाही. त्यामुळे पाठटाचणाचा आदर्श घेऊन व्यवस्थित निरीक्षण करता येत नाही. | ३ | २ |
| ५) | एकाचवेळी दोन पाठांचे निरीक्षण करावे लागते. | ३ | २ |
| ६) | हे दोन पाठ सर्वस्वी निराळे असतात. | २ | ३ |
| ७) | आयत्यावेळी पाठ रद्द केला जातो वा बदल केला जातो. | १ | ४ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापकांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| ८) | पाठनिरीक्षण व नोंद करताना दोन्हीही एकदम नीट जमत नाही. | २ | ३ |
| ९) | काही वर्गघटक व वर्गबाह्यघटक निरीक्षणावर प्रतिकूल परिणाम करतात. | ३ | २ |
| १०) | पाठनिरीक्षणात मान्वी संबंध येत असल्यामुळे वस्तुनिष्ठता राखता येत नाही. | ४ | १ |

अडचण क्रमांक २, पाचही अध्यापकांनी मान्य केलेली आहे. कारण त्या अडचणीपुढे त्यांनी सहमतीदर्शक (✓) बरोबर खूण केलेली आहे. अडचण क्रमांक १, ३, १०, चार अध्यापकांनी मान्य केलेली आहे. अडचण क्रमांक ४, ५, ९ तीन अध्यापकांनी मान्य केलेली आहे. इतर अन्य अडचणींना सहमती दर्शविणाऱ्या अध्यापकांपेक्षा वरील अडचणींना सहमती दर्शविणाऱ्या अध्यापकांची संख्या जास्त असल्याने त्या अडचणी खऱ्या व बहुसंख्यांना प्रकर्षाने जाणवतात असे मानावयास हवे.

प्रश्न क्रमांक १४ च्या उत्तरार्धात याशिवाय आणखी काही अडचणी नमूद करावयास सांगितल्या होत्या. त्या खाली दिलेल्या आहेत.

निरीक्षकांना स्वत:च्या विषयाऐवजी अन्य विषयांचे पाठही निरीक्षण करावे लागतात. त्यामुळे निरीक्षणातील विषयविशेष, सूक्ष्म बाबी आणि घटकाकडे दुर्लक्ष होऊन निरीक्षण सदोष होते. विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, स्तर, क्षमता आणि निरीक्षणात व्यक्तिभिन्नतेचा, पूर्वग्रहाचा भलाबुरा प्रभाव बाधा आणतो त्यामुळे वस्तुनिष्ठ न्यायपूर्ण आदर्श निरीक्षण होईलच अशी खात्री देता येत नाही.

या अडचणींच्या संदर्भात उपाय सुचवायचे असल्यास ते नमूद करावयास सांगण्यात आले होते. ते खालीलप्रमाणे :

वर्षाच्या सुरुवातीस कोणता पाठ कसा निरीक्षण करावा, त्यामधील कोणत्या बाबींचे निरीक्षण करावे व कशात-हेने करावे याची सविस्तर, नाविन्यपूर्ण कृतिसत्रे, चर्चासत्रे विविध अध्यापक महाविद्यालयांत एकसूत्रतेने घ्यावीत. त्यासाठी अगोदर परस्पर विचारविनिमय करावा. याबाबत प्रात्यक्षिक कार्यास महत्त्व द्यावे. पाठ निरीक्षणात एकमेव साचेबंद निकष ठेवू नयेत. आदर्श निरीक्षण पाठ घ्यावेत. भाषा निःसंदिग्ध हवी, शेरेबाजी, व्यक्तिगत लहरीस वाव देणारी नको.

वरील अडचणी व त्यावर सुचविलेली उपाययोजना यांचा सम्यक् विचार ' निष्कर्ष आणि शिफारशी ' या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

५.७ मराठी अध्यापनपध्दतीचे धोरण :

प्रश्नावलीच्या क्रमांक १५ च्या प्रश्नात संबंधित अध्यापक महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचे मराठी अध्यापनपध्दतीबद्दलचे धोरण अनुकूल आहे काय ? असा प्रश्न अध्यापकांना विचारण्यात आलेला होता आणि असल्यास तसे वाटण्याची कारणे कोणती ते नमूद करावयास सांगितले होते. तसेच धोरण अनुकूल नसल्यास त्याचीही कारणे नमूद करावयास सांगितलेली होती. पाचही अध्यापकांनी धोरण अनुकूल असल्याचे नमूद केले असून त्याची पुढील कारणे दिलेली आहेत :

१) मराठीसाठी विद्यार्थी निवड विषयज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांमधूनच केली जाते.

२) विद्यार्थ्यांना त्या विषयाच्या निरीक्षणाबाबत योग्य मार्गदर्शनाच्या सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

३) पाठासाठी योग्य साधने पुरवून वातावरण चांगले ठेवले जाते.
४) प्राध्यापक संख्या आवश्यक तेवढी आहे.
५) योग्य कार्यभार देऊन काम पाहिले जाते.
६) मराठीच्या कार्यक्रमाकडे, उपक्रमाकडे सहानुभूतीने पाहिले जाते. त्यांना उत्तेजन दिले जाते.
७) मराठी अध्यापनपध्दतीवर तज्ञांची विविध व्याख्याने, कृतिसत्रे यशस्वीरित्या पार पाडली जातात.

कारण क्रमांक १ विनाअनुदान तत्वावरील नव्या अध्यापक महाविद्यालयांतील अध्यापकाने दिलेले आहे पण प्रस्तुत संशोधकाने या नव्या अध्यापक महाविद्यालयामध्ये जाऊन निरीक्षण केले असता त्यास असे आढळले की, पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसलेल्या ब-याच प्रशिक्षणार्थ्यांना मराठी ही अध्यापनपध्दती दिलेली आहे. ज्या प्रशिक्षणार्थ्यांचा कोणताही भाषा विषय पदवी किंवा पदव्युत्तर परीक्षेस मुख्य तसेच गौणही नाही अशा प्रशिक्षणार्थ्यांना ` मराठी अध्यापनपध्दती ` दिलेली आहे.

प्रस्तुत संशोधकाने संबंधित महाविद्यालयांना भेटी दिल्या असता व विचारविमर्श केला असता, आणि निरीक्षण केले असता मराठी पध्दतीस धोरण अनुकूल असल्याच्या अशा कोणत्याही स्पष्ट बाबी प्रकर्षाने प्रत्येक ठिकाणी आढळून आल्या नाहीत. उलट मराठी अध्यापनपध्दतीबाबत उपेक्षेचे वातावरण आढळले. इंग्रजी अध्यापनपध्दतीकडे जितकी बारकाईने लक्ष देण्याची निकड व्यवस्थापनास भासते तितकी मराठी अध्यापनपध्दतीबाबत भासतेच असे नाही.

प्रश्नावलीच्या सोळाव्या प्रश्नामध्ये विद्यापीठातील अभ्यास मंडळाने अध्यापक महाविद्यालयातील मराठी अध्यापनपध्दतीच्या संदर्भात कोणते धोरण स्वीकारावे असे अध्यापकांना विचारण्यात आलेले होते. त्यांचे नमूद झालेले विचार खाली दिलेले आहेत :

१) विषय पाठ एकावत-हेचे मान्य न करता मराठीच्या बाबतीत त्यामध्ये विविधता ठेवावी.

२) सध्या दहा पाठ आवश्यक आहेत त्यापैकी तीन पाठ गद्याचे, तीन पाठ पद्याचे, दोन व्याकरणाचे, दोन निबंध रचनेचे असे वैविध्य असावे.

३) मराठी अध्यापनपध्दतीसाठी आवश्यक तेव्हा भाषा प्रयोगशाळेच्या उपयोगावर भर द्यावा.

४) मराठी अध्यापनपध्दतीस निरंतर असा उजाळा देणारे अद्ययावत् ज्ञानाचा लाभ घडवून देणारे छोटे छोटे अभ्यासक्रम, प्रशिक्षण ठेवून ते पुरे करण्याची सक्ती करावी.

५) मराठी अध्यापनपध्दती आणि वाङ्मय यांचे तौलनिक अध्यापन हवे.

६) मराठी विभाग आणि शिक्षणशास्त्र विभाग यांच्या समन्वयाने परस्परपोषक कार्ययोजना आखण्यात यावी.

७) अभ्यासक्रमातील घटकांना उपयुक्त होतील अशी पुस्तके संदर्भग्रंथ म्हणून निवडावीत.

प्रश्नावलीच्या १५ व्या प्रश्नाच्या संदर्भात अनुकूल धोरणाची कारणे आणि १६ व्या प्रश्नाच्या संदर्भात विद्यापीठातील अभ्यास मंडळाने स्वीकारावयाच्या धोरणा संदर्भात मांडलेल्या मतांचा सम्यक् विचार ` निष्कर्ष आणि उपाययोजना ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

५.८ मराठी अध्यापनपध्दतीच्या संदर्भातील
अन्य उपयुक्त माहिती :

प्रश्नावलीच्या प्रश्न क्रमांक सतरामध्ये मराठी अध्यापनपध्दतीच्या संदर्भात वर न आलेली परंतु उपयुक्त होईल अशी आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती नमूद करावयास सांगितलेली होती. अध्यापकांनी नमूद केलेली माहिती खाली दिली आहे.

१) मराठी अध्यापनपध्दतीतील नवीन संशोधनात्मक शोधनिबंधाचा, शोधप्रबंधाचा अध्यापक महाविद्यालयांतून, इतर हायस्कूलसमधून सतत अभ्यास व्हावा.

२) शिक्षणशास्त्र विभागातर्फे ` मराठी अध्यापनपध्दती ` बाबत महाविद्यालयांना उपयुक्त मार्गदर्शन आणि त्यांचे समस्यानिराकरण व्हावे.

३) प्रायोगिक उपक्रमशीलतेस वाव देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यास सुविधा उपलब्ध व्हाव्यात.

४) टी.व्ही., रेडिओ यांचा शैक्षणिक, वाङ्मयीन अभिरुचीच्या वृध्दीसाठी वापर व्हावा.

५) शिक्षकांना दृक्-श्राव्य साधनांबाबत प्रशिक्षण देताना मराठीच्या अध्यापकांनी पुढाकार घ्यावा.

तसेच प्रश्नावलीच्या १८ व्या प्रश्नात प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरणारी आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती नमूद करावयास सांगितलेली होती. नमूद केलेली माहिती खाली दिलेली आहे.

१) मराठी भाषेच्या अध्यापनाच्या विविध अंगोपांगांचा विकास होण्यासाठी सांगोपांग विचार करावा.

२) गद्य, पद्य, व्याकरणाच्या छोटया हस्तपुस्तिका अध्यापनसंदर्भात तयार कराव्यात.

३) निबंध कसे शिकवावेत ? कथा कशी शिकवावी ? याच्यासुध्दा अध्यापन-पुस्तिका निघाव्यात.

वरील उपायात्मक सूचना व माहितीचा सम्यक् विचार ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

## विभाग - ` ब `

### ५.९ प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रकरणाच्या ` अ ` विभागात प्रश्नावली क्रमांक १ भरून देणाऱ्या प्राध्यापकांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावलेला आहे.

प्रस्तुत ` ब ` विभागात पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी विषय नसलेल्या तसेच बी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती नसलेल्या तरीही मराठी पाठांचे निरीक्षण कराव्या लागणाऱ्या अध्यापकांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावलेला आहे.

### ५.१० मराठीच्या पाठाचे निरीक्षण कराव्या लागणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती :

प्रश्नावलीच्या क्रमांक दोनच्या प्रश्नाद्वारे निरीक्षक अध्यापकांची शैक्षणिक पात्रता नोंद करण्यास सांगितलेली होती. सारणी क्रमांक ५.८ मध्ये ही माहिती स्पष्ट केलेली आहे.

**सारणी क्रमांक ५.८**

मराठी पाठाचे निरीक्षण करणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता

| पदवी | अध्यापकांची संख्या |
|---|---|
| १) बी.ए., एम्.एड्. | १ |
| २) एम्.ए., एम्.एड्. | १० |
| ३) बी.एस्सी. व एम्.एड्. | २ |
| ४) एम्.एस्सी., एम्.एड्. | ३ |

| पदवी | अध्यापकांची संख्या |
| --- | --- |
| ५) बी.एस्सी., एम्.एड्., एम्. फिल्. | १ |
| ६) एम्.एस्सी.,एम्.एड्., एम्. फिल्. | १ |
| ७) बी.एस्सी., एम्.ए., एम्.एड्., एम्. फिल्. | १ |
| ८) एम्.एस्सी., एम्.ए., एम्.एड्. | १ |
| ९) एम्.ए., एम्.ए., एम्.एड्. | ३ |
| | २३ |

वरील सारणीनुसार बी.ए., एम्.एड्. (१) आणि बी.एस्सी.,एम्.एड्. (२), बी.एस्सी, एम्.एड्., एम्. फिल्.(१) असे चार वगळता उरलेले एकूण एकोणीस आवश्यक ती शैक्षणिक अर्हता मिळविलेले आहेत. हे एकोणीस अध्यापक पदव्युत्तर पदवी तसेच एम्.एड्. पदवी घेतलेले आहेत. मराठीच्या पाठाच्या निरीक्षणाचे कार्य त्या तेवीस अध्यापकांना देणे योग्य नाही. ?

प्रश्नावलीच्या प्रश्न क्र. ५ मध्ये पदवी परीक्षेचा मुख्य विषय व ऐच्छिक विषय कोणते याची विचारणा करण्यात आलेली होती. मिळालेली माहिती (५.९) या सारणीमध्ये स्पष्ट होते.

## सारणी क्रमांक ५.९

पदवी परीक्षेचा मुख्य विषय आणि ऐच्छिक
विषय असणा-या अध्यापकांची संख्या

| पदवी परीक्षेचा मुख्य विषय | अध्यापक संख्या | पदवी परीक्षेचा गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|
| भूगर्भशास्त्र | १ | इतिहास, हिंदी | १ |
| भूगोल | १ | समाजशास्त्र, इतिहास | २ |
| हिंदी | ३ | मानसशास्त्र,समाजशास्त्र | ३ |
| इंग्रजी | ३ | अर्थशास्त्र, मराठी | ३ |
| अर्थशास्त्र | ३ | भूगोल, इतिहास | १ |
| इतिहास | २ | तत्वज्ञान, अर्थशास्त्र | १ |
| मानसशास्त्र | १ | इंग्रजी | १ |
| राज्यशास्त्र | १ | प्राणी व वनस्पतिशास्त्र | १ |
| गणित | १ | गणित | १ |
| भौतिक | २ | समाजशास्त्र, अर्थशास्त्र | १ |
| रसायन | ३ | भौतिक, गणित | १ |
| प्राणि शास्त्र | १ | वनस्पतिशास्त्र, रसायन | १ |
| शास्त्र, गणित | १ | रसायन, भौतिक | १ |
| | | मराठी, मानसशास्त्र | १ |
| | | गौण नाहीत | २ |
| इंग्रजी, मराठी | १ | हिंदी | १ |
| | | प्राणि शास्त्र-रसायन | २ |
| | २३ | | २३ |

वरील सारणीनुसार असे लक्षात येते की, पदवी परीक्षेस मराठी गौण विषय घेणारे आणि मराठीच्या पाठाचे निरीक्षण करणारे दोन अध्यापक आहेत. भाषा हा मुख्य विषय घेतलेले २३ पैकी ७ आहेत याचा अर्थ असा की, २३ पैकी फक्त दोन अध्यापक पदवी परीक्षेस मराठी गौण विषय घेणारे आणि सात जण भाषा या विषयाशी संबंधित आहेत. या नऊन अध्यापकांनी मराठीच्या पाठांचे निरीक्षण केले तर, गैरसोयी लक्षात घेता ठीक होईल पण भाषेत्तर १६ अध्यापकांकडे मराठी पाठांच्या निरीक्षणाचे कार्य सोपविणे उचित नाही. ज्यांचा पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय आहे असेच अध्यापक मराठीचे पाठ निरीक्षण करण्यास पात्र असतात पण मराठीच्या पाठांचे निरीक्षण प्रत्येक अध्यापकास करावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

प्रश्नावलीच्या प्रश्नक्रमांक ६ मध्ये पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय कोणता आणि गौण विषय कोणते याबाबतीत विचारणा करण्यात आलेली होती. सारणी क्र. ५.१० मध्ये मिळालेली माहिती नमूद केली आहे.

<u>सारणी क्र. ५.१०</u>

पदव्युत्तर परीक्षेस मुख्य आणि गौण विषय
घेतलेल्या अध्यापकांची संख्या

| पदव्युत्तर परीक्षेस मुख्य विषय | अध्यापक संख्या | पदव्युत्तर परीक्षेस गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|
| शिक्षणशास्त्र | १ | तौलनिक शिक्षण | ४ |
| भूगोल | १ | अमेरिकन भूगोल | १ |
| हिंदी | ४ | राज्यशास्त्र | १ |
| इतिहास | १ | मराठी | १ |
| मानसशास्त्र | १ | मानसशास्त्र | १ |
| इंग्रजी | १ | कार्बनी रसायन | १ |
| अर्थशास्त्र | २ | गौण विषय असलेले | १४ |
| | | एकूण: | २३ |

| पदव्युत्तर परीक्षेस | अध्यापक संख्या | पदव्युत्तर परीक्षेस गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|
| मराठी, हिंदी (स्वतंत्र) एम.एड्. | १ | | |
| इंग्रजी, तत्वज्ञान (स्वतंत्र) एम.एड्. | १ | | |
| भौतिक | ३ | | |
| रसायन | २ | | |
| समाजशास्त्र | १ | | |
| इतिहास ) (स्वतंत्र) एम.एड्.<br>मूर्तिशास्त्र ) | १ | | |
| शिक्षणाचा इतिहास | १ | | |
| इंग्लिश )<br>केमिस्ट्री ) | १ | | |
| विषय नाही | १ | | |
| एकूण : | २३ | | |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय घेतलेले आणि मराठी पाठांचे निरीक्षण करणारे यांची संख्या केवळ एक आहे तसेच पदव्युत्तर परीक्षेस मराठी विषय गौण घेतलेल्यांची संख्या केवळ एक आहे. भाषा विषयाशी संबंधित तेवीसपैकी केवळ ८ आहेत म्हणजे उर्वरित १५ अध्यापक भाषेतर विषय घेतलेले आहेत, आणि ते मराठीच्या पाठाचे निरीक्षण करतात, ही वस्तुस्थिती मराठीच्या पाठाचे निरीक्षण मराठीच्या अध्यापकांनी करावे या तत्वास पोषक नाही.

प्रश्नावलीच्या ७ व्या प्रश्नामध्ये तसेच ८ व्या प्रश्नामध्ये अनुक्रमे बी.एड्. परीक्षेसाठी घेतलेल्या अध्यापनपध्दती आणि प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत असलेल्या

अध्यापनपध्दती कोणत्या याबाबत विचारणा करण्यात आलेली होती. सारणी क्र. ५.११ मध्ये बी.एड्. परीक्षेसाठी घेतलेल्या अध्यापनपध्दती आणि सारणी क्र.५.१२ मध्ये प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत असलेल्या अध्यापनपध्दती यांचा तपशील नोंदविण्यात आलेला आहे.

<u>सारणी क्र.५.११</u>

बी.एड्. परीक्षेसाठी घेतलेल्या अध्यापनपध्दती

| अध्यापनपध्दती | अध्यापकांची संख्या |
|---|---|
| शास्त्र-गणित | ७ |
| भूगोल-इतिहास | २ |
| हिंदी-इतिहास | ४ |
| इंग्लिश-भूगोल | ३ |
| मराठी-इतिहास | १ |
| मराठी-हिंदी | १ |
| हिंदी-इंग्रजी | १ |
| हिंदी-गणित | १ |
| इंग्लिश-शास्त्र | २ |
| मराठी-भूगोल | १ |
| एकूण : | २३ |

सारणी क्र. ५.१२

प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत असलेल्या अध्यापनपध्दती

| अध्यापनपध्दती | अध्यापक संख्या |
|---|---|
| विज्ञान, गणित | ३ |
| विज्ञान | १ |
| गणित | २ |
| शास्त्र-भूगोल | १ |
| भूगोल | २ |
| अर्थशास्त्र-भूगोल | १ |
| इंग्रजी, भूगोल | १ |
| इंग्लिश | ३ |
| हिंदी | ५ |
| इतिहास | ३ |
| मेथड न शिकविणारे | १ |
| एकूण : | २३ |

वरील दोनही सारण्यांचा विचार करता असे आढळते की, बी.एड. परीक्षेसाठी मराठी अध्यापनपध्दती तिघा अध्यापकांची असूनसुध्दा त्यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शन करावयाच्या पध्दती भिन्न आहेत. अशा तिघा अध्यापकांना मराठी पाठांचे निरीक्षण करण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. तसेच इतर भाषाविषयांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन करणाऱ्या नऊ अध्यापकांना मराठी पाठाच्या निरीक्षणाचे कार्य दिले तरीही उचित होईल. पण भाषेत्तर इतर अध्यापकांना मराठीच्या पाठाचे निरीक्षण कार्य दिले जाऊ नये. ज्यांचा भाषा हा विषय पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस आहे आणि बी.एड.ला कोणतीही भाषा एक

अध्यापनपध्दती म्हणून घेतलेली आहे अशा अध्यापकांना मराठी पाठ निरीक्षणाचे कार्य देणे योग्य होईल. तथापि ज्यांचा पदवी आणि-किंवा पदव्युत्तर मराठी हा मुख्य विषय आहे तसेच बी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती आहे असे अध्यापक मराठीच्या पाठाचे निरीक्षण करणारे असावेत हे इष्ट होय. अध्यापक महाविद्यालयात गैरसोयी, अडचणी असल्या तरी भाषा विषयाच्या अध्यापकांना मराठी पाठाचे निरीक्षण कार्य देणे, भाषेतर अध्यापकांना मराठी पाठाचे निरीक्षण कार्य देण्यापेक्षा चांगले होईल. परंतु वरील सारणीवरून असे आढळले की भाषाध्यापन पध्दती घेतलेले अध्यापकसुध्दा २३ पैकी ९ आहेत म्हणजे कमी आहेत आणि ही स्थिती समाधानकारक नाही.

५.११ मराठी पाठांचे निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी :

प्रश्नावलीच्या `ब` विभागात ९ व्या प्रश्नात मराठी पाठांचे निरीक्षण करताना येणाऱ्या संभाव्य अडचणी दिलेल्या होत्या आणि अध्यापकांना योग्य वाटेल अशा अडचणींपुढे सहमतीदर्शक (✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्र. ५.१३ मध्ये मिळालेला प्रतिसाद नमूद केलेला आहे.

**सारणी क्र. ५.१३**

मराठी पाठाचे निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापक संख्या होय | अध्यापक संख्या नाही |
|---|---|---|---|
| १) | प्रशिक्षणार्थ्यांच्या मराठी पाठात होणाऱ्या चुका नीट समजावून सांगणे विषयज्ञानाच्या अभावामुळे जमत नाही. | १३ | १० |
| २) | प्रशिक्षणार्थ्यांनी केलेले चुकीचे विवेचन व दिलेले चुकीचे अर्थ किंवा संदर्भ याबद्दल स्वतःला नक्की खात्री होत नाही. | ९ | १४ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | अध्यापक संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ३) | विषयाचे बारकावे स्वत:स त्यावेळी तरी चटकन् कळत नाहीत. | १४ | ९ |
| ४) | बोली भाषेतील पाठाच्या अनाकलनामुळे निरीक्षण नीट करता येत नाही. | ९ | १४ |
| ५) | व्याकरणाचा पाठ पाहताना प्रशिक्षणार्थ्यांनी केलेल्या चुका समजत नाहीत. | ११ | १२ |
| ६) | स्वत:ची अध्यापनपध्दती मराठी नसल्याने या अध्यापनपध्दतीचे सूक्ष्मतंत्रज्ञान माहीत नाही. | १४ | ९ |
| ७) | या पध्दतीची वैशिष्ठ्ये, बारकावे चटकन् उमगत नाहीत. | १२ | ११ |
| ८) | मराठी ही अध्यापनपध्दती नसल्यामुळे पाठ-निरीक्षण व्यवस्थित करणे जमत नाही. | ९ | १४ |
| ९) | स्वत:स मराठीच्या पाठ्यपध्दतीच्या नवतंत्राचे नीट आकलन झालेले नसते. | १४ | ९ |
| १०) | पाठाचे मूल्यमापन स्थूल होते. | १७ | ६ |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की अडचणी क्र. २/१०, ३, ६, ९, १३, १२ ह्या ख-या व बहुसंख्य अध्यापकांनी मान्य केलेल्या आहेत. कारण ह्या अडचणी मान्य करणा-यांची संख्या जास्त आहे तर अडचणी क्र. १, ४ आणि ८ ह्या अडचणी आहेत असे मानणा-यांची संख्या फार अल्प आहे.

या ' ब ' विभागाच्या उत्तरार्धात या व्यतिरिक्त येणा-या आणखी काही अडचणी नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. त्या खाली दिलेल्या आहेत.

१) मराठी अध्यापनपध्दतीच्या निरीक्षणास आवश्यक असे बारकावे नीट ज्ञात नसल्याने भाषाध्यापन उद्दिष्टानुसार चालले आहे किंवा नाही हे नीट कळत नाही ही अडचण क्र. ३ च्या अडचणीस पुष्टी देणारी आहे.

२) उद्दिष्टे स्पष्ट होत नाहीत. ही अडचण क्र. ६ च्या स्वतःची अध्यापनपध्दती मराठी नसल्याने या अध्यापनपध्दतीचे सूक्ष्म तंत्रज्ञान माहीत नाही या अडचणीस पुष्टी देते.

३) मराठी व्याकरणाचा पाठ प्रशिक्षणार्थी उद्गामी पध्दतीने न घेता अवगामी पध्दतीने घेतात. ही अडचण क्र. ५ व्याकरणाचा पाठ पाहताना प्रशिक्षणार्थ्यांनी केलेल्या चुका समजत नाहीत या अडचणीशी संबंधित आहे.

४) सराव पाठात साधनांचा कमी वापर करतात. वापरात कल्पकता कमी असते. ही अडचण क्र. ६ ला पुष्टी देणारी आहे.

५) प्रशिक्षणार्थ्यांच्या विषयप्रभुत्वाची खात्री शेवटपर्यन्त होत नाही.

६) प्रशिक्षणार्थ्यांचे विषयज्ञान कमी आढळते. त्रोटक वाचन असल्याने विषयांश खुलासेवार मांडता येत नाही. ह्या अडचणी क्र. १ च्या अडचणीशी सुसंगत आहेत.

७) पाठतंत्राचे अपुरे कच्चे ज्ञान असते.

८) शुध्द लेखनात खूप चुका आढळतात.

९) प्रशिक्षणार्थ्यांना सूचना देऊनही फारशी सुधारणा आढळत नाही.

१०) पाठाच्या मार्गदर्शकाकडून नीट शंका निरसन होत नाही.

११) निरीक्षण कसे करावे याचे पूर्वप्रशिक्षण नीट दिले जात नाही.

१२ ) सूक्ष्म दुवे नोंदवायचे कौशल्य ज्ञात नसते.

१३) पाठटाचण आणि प्रत्यक्ष पाठ यात फरक असल्याने निरीक्षण संतुलित होत नाही.

१४) वर्गातील गोंधळामुळे निरीक्षणाला बाधा येते.

वरील अडचणींपैकी अडचण क्र. ११ आणि १४ ह्या अडचणी विचारार्ह आहेत.

या अडचणींच्या संदर्भात अध्यापकांना त्यांच्या उपायात्मक सूचना नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. नमूद झालेल्या सूचना खाली दिल्या आहेत :

१) बारकावे लक्षात येण्यासाठी भाषाध्यापन पध्दतीतील दीर्घ अनुभव असलेल्या अध्यापकांकडून अध्यापन, मार्गदर्शन, निरीक्षण केले जावे.

२) वारंवार कृतिसत्रे अध्यापकांकडून घेतली जावीत.

३) निरीक्षणाचे तंत्र सर्वांना नीट समजावून द्यावे.

४) मार्गदर्शकांनीच अध्यापनपध्दतीच्या पाठांचे निरीक्षण करावे.

५) प्रत्यक्ष आदर्श निरीक्षण दाखवून निरीक्षणे करवून घ्यावीत.

६) अभिनव निरीक्षण पुस्तिका निघाव्यात.

७) विविध पाठांचे विविध दृष्टिकोणांतून निरीक्षण कसे करावे हे समजून द्यावे.

८) व्याकरणाचा पाठ कसा निरीक्षावा हे समजावून द्यावे.

९) आदर्श निरीक्षण पाठाचे नमुने सादर करावेत.

१०) निरीक्षणाच्या साधनांच्या वापराबाबत मार्गदर्शन व्हावे.

११) निरीक्षण आणि मूल्यमापन यांचा परस्परसंबंध स्पष्ट व्हावा.

१२) निरीक्षणांतर्गत सूक्ष्म घटकांवर प्रथम वेगळा नंतर समग्र असा भर कृतिसत्रामध्ये द्यावा.

१३) श्रेणींचा तपशील स्पष्ट करावा.

१४) निरीक्षणाची प्रात्यक्षिके महत्वाची आहेत.

१५) निरीक्षण तक्ता, निरीक्षण कसोटया, तत्वे, साधने यांचे ज्ञान द्यावे.

वरील उपायांचा मथितार्थ असा की, निरीक्षणाचे सूक्ष्म तंत्रज्ञान देणारी कृतिसत्रे आरंभी घ्यावीत आणि निरीक्षण साधनांच्या वापराचे ज्ञान मिळावे.

## ५.१२ प्रस्तुत संशोधनास अन्य उपयुक्त माहिती :

प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरणारी आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती नमूद करावयास निरीक्षक अध्यापकांना सांगितली होती. नमूद झालेली माहिती खाली दिलेली आहे.

१) कविता शिकविल्यानंतर संगीताच्या चालीवर ध्वनिमुद्रित केलेली ध्वनिफीत विद्यार्थ्यांना ऐकविली जाते की नाही हे निरीक्षावे.

२) निरीक्षणात शेवटी गडबड होऊन देऊन नये.

३) अचूक, वस्तुनिष्ठ निरीक्षणावर भर हवा.

४) कोणतीही अध्यापनपध्दती मिळत नाही म्हणून मराठी अध्यापन-पध्दती नाईलाजाने घेतली असे होऊन नये. तसेच पात्र आणि योग्य प्रशिक्षणार्थ्यांनाच आगोदर मुलाखत व चाचणी घेऊन मराठी अध्यापनपध्दती द्यावी.

५) प्रशिक्षणार्थ्यांच्या पाठातील उणीवांचे खुलासेवार स्पष्टीकरण पाठनिरीक्षकांनी पाठ संपल्यावर करावे.

६) प्रशिक्षणार्थ्यांना त्यांचे अध्यापन चालू असता निरीक्षकाने मध्येच अकारण हस्तक्षेप करू नये.

७) पाठाच्या निरीक्षणाची नोंद निरीक्षण करतानाच केली जावी.

सूचना क्रमांक २, ३, ५, ६, ७ या नवीन आहेत. सूचना क्र. ४ च्या संदर्भात, मराठी अध्यापनपध्दती इतर कोणतीही अध्यापनपध्दती मिळत नाही म्हणून नाईलाजाने घेतली असे प्रस्तुत संशोधकास संबंधित अध्यापक महाविद्यालयात निरीक्षण करताना वा मुलाखती घेताना आढळले.

पूर्वचाचणी घेऊन मराठी अध्यापनपध्दती त्या प्रशिक्षणार्थ्यांना दिली असेही प्रस्तुत संशोधकास संबंधित अध्यापक महाविद्यालयांना भेटी दिल्यावर आढळले नाही.

५.१३ समारोप :

प्रस्तुत प्रकरणात (प्रकरण पाचवे) मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांच्या आणि मराठी पाठाचे निरीक्षण करणाऱ्या अध्यापकांच्या समस्यांचे वर्गीकरण करून विश्लेषण केले आणि अन्वयार्थ लावला. पुढील प्रकरणात (प्रकरण सहावे) प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्यात येईल.